स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 18–11–2016** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 4. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 5. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 6. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 7. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 8. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 10. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 11. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 12. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |
| 13. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 2. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अपर आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 726ः– {विद्युत विभाग} नेहरूनगर झोन क. 05, मधील श्रीकृष्णनगर शेषनगर व शक्तीमातानगर येथे 6 मी खांबावर एल.ई.डी. फिटींग लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 47,48,237/– च्या प्राकलनीय राशीपेक्षा 2.99% ने कमी असलेली रू. 46,06,265/– ची निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 727</u>:– प्रभाग क्र. ५१ (ब) अंतर्गत वसंतनगर येथील मुख्य रस्त्यांचे
{लोककर्म झोन 4} डांबरीकरण व रूंदीकरण करण्याचे काम करण्याचा कामास्तव रु. 38,77,070/–(अक्षरी अडतीस लक्ष सत्यात्तर हजार सत्तर रूपये फक्त) रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 728</u>:– विभागीय अधिकारी/कर्मचारी यांना सुधारित गणवेश व
<u>{अग्नीशमन विभाग}</u> गणवेश साहित्य खरेदी कार्याचे ई–निविदा मागविणेबाबत.

विभागीय अधिकारी/कर्मचारी यांचे सुधारीत गणवेश व गणवेश साहित्य नियमावली संदर्भातील महासभा विषेश ठराव क्र. २७४ दि. २०.०६.२०१६ प्रमाणे मंजुर झाले आहे. त्यानुसार अधिकारी/कर्मचारी वर्गांना सुधारित गणवेश नियमावलीप्रमाणे खालील गणवेश साहित्य खरेदी करून घेणे आवश्यक आहे.

| Sr. No. | Particulars | Specification | Qty. |
|---|---|---|---|
| 1 | Trouser | Navy blue, Sapphire cloth trouser of Raymond make Quality (code) No. 415384, shade No. 009 with big Loop for the belt- | 249 |
| 2 | Shirt | Raymond Make (Trovin) Code No.2073903, shade No 001 (White) tucking shirt (half sleeves) with 2 breast pocket, shoulder flaps, liberty collar | 28 |
| 3 | Shirt | Sky Blue Bombay Dying or Raymond Make (Trovin) tucking shirt with 2 breast pocket ,shoulder flaps, liberty collar including stitching charges | 249 |
| 4 | Tunic | Flame Retardant jacket made from 100% Cotton FR Fabric of 340 g/m2 (+/-10%) Fabric should be certified to following EN Standard<br>*Certified to EN ISO 11611 :2007 Class 1,A1<br>*Certified to EN ISO 11611:2008 Class A1, A2, B1, C1, DO, E3, & F1<br>*Certified to NFPA 2112for flame retardency<br>*Certified to EN 61482<br>*Certified to OEKO-TEX Standard 100 .Product Class 1 for safe use With human skin Contact with Buttons. | 271 |
| 5 | Rain Coat | Navy blue colour Shirt pant & cap<br>शर्टाच्या पाठीमागे रेडीयम मिश्रीत लाल रंगाने (नेव्ही ब्ल्यु विथ रीफ्लेक्शन स्ट्रिप) विभागाचे नाव व सिंबल छपाई केलेले सुपर क्वॉलिटी वॉटर प्रुफ असलेले | 277 |
| 6 | Gum Boot | Full Length of Gumboot 01 Pair water Proof IS Mark, black colour With yellow shade on Sole. | 277 |
| 7 | Jerkeen | Navy Blue Woolen Search Raymond Mill, shoulder and elbow flaps. | 277 |
| 8 | Leather Shoes | Oxport pattern/ Ambassador Bata Make Black Leather shoes, Superior Quality | 277 |
| 9 | Socks | Navy Blue Socks -02 pairs. | 554 |
| 10 | Lenyard | Whistle &Lanyard 38"length Black Colour Double Line | 277 |
| 11 | Helmet | Yellow, White, Silver, Red Colour Safety Helmet 01 No Glass, Fiber Super fine Quality IS Mark with Monogram | 277 |
| 12 | Pea Cap | 1. Peak Cap with 2 metal buttons, NFES Monogram with Satin Jari Embroidery & Jari wreath (Golden, Silver Satin Jari) on peak with satin ribbon | 28 |
| 13 | Barried Cap | NFES Monogram with Satin Jari Embroidery. | 249 |
| 14 | Leather Belt & Buckal | Best Quality Black Leather belt 2½" With steel buckle embossed/ etched monogram with NFES (As per department sample) | 277 |
| 15 | Overall | Navy blue colour overall with Breast pocket and shoulder flaps. | 12 |
| 16 | T-Shirt | Dark Blue with logo | 24 |
| 17 | Service Name Plate | Length- 4 Cm., Height 1.3 Cm., White Metal | 277 |
| 18 | Shoulder Title, Shoulder Batch | **Blue Flap :-** Two Embroidery Bar ½ inch wide and 1 & ½ inch long circular Cross section with flat bottom surface | 277 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Shoulder Title, Shoulder Batch | Impeller I", ¾", ¼" | 120 |
| 20 | Tie | Navy Blue colour woolen silk/Nylon or Terricoat | 28 |

सध्या विभागात अस्थापनेवर ४११ वेगवेगळे मंजूर पदे असून १७८ जागा रिक्त असून १ कार्य. प्रमुख अग्निषमन अधिकारी, २ स्थानाधिकारी, १ सहा. स्थानाधिकारी २४ कार्य. सहा. स्थानाधिकारी, १९५ कर्मचारी व ५४ इतर विभागातील वाहनचालक असे एकुण २७७ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. याकरीता अनु क्र. १ ते २० पर्यंतचे सुधारीत गणवेश व गणवेश साहित्य खरेदीसाठी रू. ७७,६५,६४० खर्च अपेक्षित आहे.

करीता २७७ विभागीय अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत गणवेश नियमावलीनुसार गणवेश व गणवेश साहित्य खरेदी करून घेण्यास ई–निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 729</u>ः–**
**{लोककर्म झोन 09}**

प्रभाग क्र. 20 (अ+ब) लष्करीबाग येथील रस्त्यांच्या डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी प्रेमचंद्र राचुमल यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 29,99,900/– पेक्षा 1.0079 टक्के जास्त दराची वाटाघाटी नंतर प्राकलनीय दरावरील निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 682(A22001330803) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 730</u>ः–**
**{लोककर्म झोन 01}**

प्रभाग क्र. 68 'अ' व 'ब' मधील संताजी सोसा., बालपांडे लेआउट, उमंग सोसा., कर्वे नगर, उज्जवल नगर, नरेन्द्रनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. पी. के. नगरारे कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. २९,९९,४९४/– (एकोनतीस लक्ष, नव्यान्नव हजार, चारशे चौऱ्यान्नव फक्त) रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 731</u>ः–**
**{अग्नीशमन विभाग}**

17,000 लि. क्षमतेचे 2250 LPM Pump क्षमता असलेले 2 नग Water Browser Fabrication कार्य करणे व त्यास लागणारे चेसीस खरेदी करणेबाबत.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात 5000, 4500 लि. क्षमतेचे असे 16 वॉटर फायर टेंडर आहेत. या फायर टेंडरवर 1800, व 2250 लि./प्रती मिनिट या क्षमतेचे पंप बसविले आहेत. ज्यामुळे आग विझवितांना फायर टेंडरचे पाणी 2 ते 3 मिनिटात संपुन जाते. लगेच वाहनाला पाणी भरण्याकरीता रवाना करावे लागते. या दरम्यान दुसऱ्या वाहनाची व्यवस्था करून घ्यावी लागते.

विभागाकडे मोठया आगीच्या दुर्घटनेवर कार्य करण्यास Water Browser नसल्याने अशा आगीवर (Major Fire) जास्त वाहनाची व्यवस्था करतेवेळेस वाहनचालक व आग विझविणारे कर्मचारी सुद्धा जास्त प्रमाणात ठेवावे लागते. या गोष्टी टाळण्याकरीता कमीत कमी 17,000 लि. क्षमतेचे 2250 LPM Pump असलेले 2 नग Water Browser विभागाकडे असणे आवश्यक आहे.

करीता 2 नग 17,000 लि. क्षमतेचे 2250 LPM Pump क्षमता असलेले Water Browser Fabrication कार्य करून घेण्याकरीता ई–निविदा मागविणे व 2 नग TATA LPT 3118 BSIII चेसीस Special Govt. Price /DGS & D Rate Contract (कार्यादेश देतेवेळेस जे

दर राहतील त्याप्रमाणे) M/s. TATA Motors Ltd., Nagpur यांचेतर्फे अग्रीम काढून खरेदी करून घेण्यास यापोटी येणारा अपेक्षित खर्च (फेब्रिकेशन कार्य रू. 86,94,000 + चेसीस खरेदी 51,24,289) असे एकुण रू. 1,38,18,289 खर्चाचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 732</u>:— {अग्नीशमन विभाग} 2,000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4 नग Small Water Fire Tender Fabrication कार्य करणे व त्यास लागणारे चेसीस खरेदी करणेबाबत.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात 2500 लि. क्षमतेचे 26 वर्षा आधीचे 3 स्मॉल वॉटर फायर टेंडर, असून तांत्रिक दृष्टया अकार्यक्षम आहेत. नागपूर शहरात गर्दीच्या बाजारपेठा, स्मॉल स्केल इंडस्टीज एरिया, कमी रूंदी रस्त्याचे वस्त्या, स्लम एरिया, अशा ठिकाणी झालेल्या दुर्घटनेवर मोठे वॉटर फायर टेंडर जावू शकत नाही. अशा ठिकाणी या छोटया वाहनांना दुर्घटनांवर पाठविण्यात येत असतात. याकरीता विभागाकडे तांत्रिकदृष्टया सक्षम असलेले Small Water Fire Tender विभागाकडे असणे आवश्यक आहे.

करीता 4 नग स्मॉल वॉटर फायर टेंडरचे फेब्रिकेशन कार्य करून घेण्याकरीता ई—निविदा मागविणे व यांस लागणारे 4 नग SFC 709 EX/38 Truck Chassis M//s. TATA Motors Ltd., Mumbai यांचेतर्फे शासकीय दरकराराप्रमाणे अग्रीम काढून खरेदी करून घेण्यास यापोटी येणारा अपेक्षित खर्च (फेब्रिकेशन कार्य रू. 98,43,400 + चेसीस खरेदी रू. 34,72,565) कार्यादेश देतेवेळेस शासकीय दरकरारामध्ये वाढ किंवा घट असे एकुण रू. 1,33,15,965 खर्चाचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 733</u>:— {अग्नीशमन विभाग} महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियम 2006 चे तरतुदींनुसार सुधारित अग्निशमन सेवा शुल्क लागू करण्याबाबत.

विभागातर्फे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियम 2006 चे तरतुदींनुसार (Municipal Corporation where population exceeds 10 lakhs but does not exceed 25 Lakhs) महासभा ठराव क्र. 355 दि. 10.02.2009 नुसार अग्निशमन सेवा शुल्क व इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क तक्ता ''अ'' व ''ब'' प्रमाणे शुल्क आकारण्यात येत होते. मा. आयुक्त यांचे मंजुरी आदेशान्वये उपरोक्त शुल्क आकारणीत वाढ करून दिनांक 30.11.2011 पासून शुल्क आकारणी लागू करण्यात आली.

सदर विषय धोरणात्मक असल्याने या विषयास महासभेपुढे कार्योत्तर मंजुरीकरीता ठेवण्यात आले होते. महासभा ठराव क्र. 110 दि. 20.06.2015 प्रमाणे सदर ठरावाद्वारे खालील प्रमाणे एकमताने निर्णय घेण्यात आला.

A) आग प्रतिबंधक व जिव संरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 चे तरतुदीनुसार शासनाने दि. 03.03.2014 पासून शुल्क आकराणीचा अध्यादेश जारी केले आहे. त्यानुसार शेडयुल I प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.
B) दिनांक 03.03.2014 पुर्वी म.न.पा. ठरावा अंतर्गतचे शुल्क शासनाच्या शुल्कापेक्षा जास्त असतील तर त्याच दराने शुल्क आकारण्यात यावे.
C) मा. आयुक्तांनी दिनांक 30.11.2011 पासून स्थायी समिती व म.न.पा. सभागृहाच्या मान्यतेशिवाय केलेली वाढ निरस्त करण्यात येत आहे. तसेच प्रशासनाला अशाप्रकारची चुक भविष्यात होणार नाही याप्रमाणे ताकीद दिली आहे.

D) दिनांक 03.03.2014 च्या शासनाच्या शेडयुल मध्ये जर म.न.पा. ला काही सुधार करावयाचा असल्यास शासनाची मंजुरी घेणे बंधनकारक राहील. याप्रमाणे सदर ठरावाद्वारे निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त शुल्क आकारणीबाबत जनहीत याचिका क्र. 107/2013 मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखिल होती. या विषयासंबंधात **मा. उच्च न्यायालयाने म.न.पा. च्या विरूध्द खालीलप्रमाणे निर्णय दिला.**

1. 2006 च्या नियमाला जे संविधानिक विधी ग्राहयतेचे आव्हान केले होते ते मा. उच्च न्यायालयाने फेटाळून लावले.
2. दि. 03.03.2014 अगोदर लादलेला शुल्क व दि. 03.03.2014 च्या नंतरच्या परिशिष्ट II मध्ये नमुद केलेल्या करापेक्षा जास्त कर आकारण्यात आलेला आहे. वाढीव शुल्क बेकायदेशिर असल्याचे नमूद केले आहे.
3. मालक व भोगवटदार यांचेतर्फे जे शुल्क आकारण्यात आले होते त्यांना शुल्क पारीत आदेशाच्या दिनांकापासून आठ (8) आठवडयाच्या आंत परत करणे. याप्रमाणे निर्देश देण्यात आले.
4. इमारत बांधकाम धारकाकडून विभागाने वाढीव शुल्क आकारणी प्रमाणे शुल्क घेतले बांधकाम धारकाने भोगवटदारांना विक्री करतांना या शुल्काचा अंतर्भाव करूनच त्यांचेकडून रक्कम घेतली असल्याने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द केवळ निधी परतावयाच्या मुद्दयावर सर्वोच्च न्यायालयात Special Leave Petition दाखल करण्यात आली. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. 14.03.2016 ला उपरोक्त प्रकरणाबाबत मा उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे Review (परीक्षणा) करीता दाखल करण्याबाबत आदेश पारित केल्यानंतर मा उच्च न्यायालयात Review Petition (परीक्षणाकरीता) दाखल करण्यात आली होती. तीसुध्दा खारीज करण्यात आली.

विभागातर्फे वाढीव सुधारीत शुल्क आकारणीप्रमाणे लागू केल्यानंतर विभागाच्या उत्पन्नात खालीलप्रमाणे वाढ झाली होती.

| अ.क्र | सन | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|
| 1 | 2006—07 | 13,49,634 |
| 2 | 2007—08 | 19,42,724 |
| 3 | 2008—09 | 67,59,292 |
| 4 | 2009—10 | 1,63,91,222 |
| 5 | 2010—11 | 1,54,07,122 |
| 6 | ➢ 2011—12 | 2,39,56,746 |
| 7 | ➢ 2012—13 | 7,44,58,722 |
| 8 | ➢ 2013—14 | 5,50,81,527 |
| 9 | ➢ 2014—15 | 3,61,25,810 |
| 10 | ➢ 2015—16 | 2,27,13,089 |

उपरोक्त उत्पन्नाचे तक्त्याचे तुलनात्मक अवलोकन केले असता सन 2014 ते 2016 या दरम्यान वाढीव शुल्क आकारणी स्थगित झाल्याने विभागाच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात कमतरता आली आहे. ज्यामुळे अग्निशमनाचे कार्य पार पाडण्याच्या संबंधित गरजा

भागविण्याकरीता विभागाला आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. याकरीता सुधारीत अग्निशमन सेवा शुल्क वाढविल्यास विभागाचे उत्पन्नात वाढ करून घेणे आवश्यक आहे.

नागपूर शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढली असून 25 लाखापेक्षा जास्त झाली आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 11(1) उपकलम (2) व (3) चे तरतुदीनुसार सुधारित अग्निशमन शुल्क आकारणी तक्ता 'अ' (Schedule II, Section. 3(1) Municipal Corporation where population exceeds 25 lakhs but does not exceed 50 Lakhs) याप्रमाणे या तक्त्याचा आधार घेवून वाढीव शुल्क आकारणीचा खालीलप्रमाणे तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Types of Building | Schedule II, Section. 3(1) Municipal Corporation where population exceeds 10 lakhs but does not exceed 25 Lakhs (महासभा ठराव क्र. 355 दि. 10.02.2009 प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे) | | Schedule II, Section. 3(1) Municipal Corporation where population exceeds 25 lakhs but does not exceed 50 Lakhs (शहराची लोकसंख्या 25 लाखापेक्षा जास्त झाल्याने वाढीव शुल्क आकारणी साठी अधिनियमातील या तक्त्याचा आधार घेण्यात येत आहे) | | Proposed revised Rate (विभागातर्फे प्रस्तावित केलेले वाढीव शुल्क) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **Fee in Rs. Per Sq. mtr.** | **Subject to Minimum of Rs.** | **Fee in Rs. Per Sq. mtr.** | **Subject to Minimum of Rs.** | **Fee in Rs. Per Sq. mtr.** | **Subject to Minimum of Rs.** |
| | Residential Building (A) | | | | | | |
| a) | Lodging or Rooming Houses (A-1) Less than 15 m in height | | | | | | |
| | i) Up to 15 rooms | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) More than 15 and up to 30 rooms | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| | iii) More than 30 room | **07** | **30,000** | **08** | **35,000** | **16** | **70,000** |
| b) | Apartment Houses (A-4) | | | | | | |
| 1 | From 15 m to 24 m in height | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **12** | **75,000** |
| 2 | 24 m and above but not exceeding 35 m in height | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **18** | **90,000** |
| 3 | Above 35 m but not exceeding 45 m in height | **07** | **35,000** | **08** | **50,000** | **24** | **1,50,000** |
| 4 | Above 45 m in height | **10** | **50.000** | **12** | **75,000** | **48** | **3,00,000** |
| c) | Hotels (A-5) | | | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | | | |
| | i) Covered area not exceeding 300 m2 on each floor. | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Covered area exceeding 300 m2 but not more 1000 m2 on each floor | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| | iii) Covered area exceeding 300 m2 but not more 1000 m2 on each floor | **07** | **35,000** | **08** | **40,000** | **16** | **80,000** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m | **10** | **50,000** | **12** | **75,000** | **36** | **2,25,000** |
| 3 | Above 30 m in height | **12** | **75,000** | **15** | **1,00,000** | **45** | **3,00,000** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| D | Hotels (Stared) (A-6) | | | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | | | |
| | i) 3 starred Hotels | **12** | **75,000** | **14** | **90,000** | **28** | **1,80,000** |
| | ii) 5 starred Hotels | **15** | **1,00,000** | **18** | **1,25,000** | **36** | **2,50,000** |
| | iii) 5 starred Deluxe Hotels | **20** | **1,50,000** | **22** | **1,40,000** | **44** | **2,80,000** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m m height | **25** | **2,00,000** | **28** | **2,50,000** | **84** | **7,50,000** |
| 3 | Above 30 m in height | **30** | **2,00,000** | **35** | **3,00,000** | **105** | **9,00,000** |
| | EDUCATIONAL BUILDING (B) | | | | | | |
| 1 | Less than 15 min height | | | | | | |
| | i) Ground plus one storey | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Ground plus two storey | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| 2 | 15 m and above but not exceeding 30 m in height | **07** | **35,00** | **08** | **40,000** | **16** | **80,000** |
| | INSTITUTIONAL BUILDING | | | | | | |
| a) | Hospitals, Sanatoria and Nursing Homes (c-1) | | | | | | |
| 1 | Less than 15 m in height | | | | | | |
| | i) Up to ground plus one story with plot area less than 1000 m2 with no beds | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Up to ground plus one story with plot area greater than 1000 m2 with beds. | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| | iii) Above two story, with no bead | **06** | **30,000** | **07** | **35,000** | **14** | **70,000** |
| | iv) Above two story, with bead | **05** | **35,000** | **08** | **40,000** | **16** | **80,000** |
| 2 | 15 m and above but not exceeding 24 m in height | **08** | **40,000** | **09** | **45,000** | **27** | **1,35,000** |
| 3 | Above 24 m and not exceeding 30 m in height | **10** | **50,000** | **12** | **60,000** | **36** | **1,80,000** |
| b | Custodial (c-2) and penal and plental (c-3) | | | | | | |
| 1 | Less than 10 m in height | | | | | | |
| | i) Up to 300 persons | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) More than 300 persons | **05** | **25,000** | **05** | **30,000** | **10** | **60,000** |
| 2 | 10 m and above but not exceeding 15 m in height | **05** | **30,000** | **07** | **35,000** | **14** | **70,000** |
| 3 | 15 m and above but not exceeding 24 m in height | **07** | **35,000** | **09** | **45,000** | **27** | **1,35,000** |
| 4 | 24 m and above but not exceeding 30 m in height | **10** | **50,000** | **12** | **60,000** | **36** | **1,80,000** |
| | ASSEMBLY BUILDING (D)<br>(D-1 TO D-5) | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Less than 10 m in height | | | | | | |
| | i) Up to 300 persons | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) More than 300 persons | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| 2 | Above 10 m but not exceeding 15 m in height | **06** | **30,000** | **07** | **35,000** | **14** | **70,000** |
| 3 | Above 15 m but not exceeding 24 m in height | **07** | **35000** | **09** | **50,000** | **27** | **1,50,000** |
| 4 | Above 24m but not exceeding 30 m in height | **10** | **50,000** | **12** | **75,000** | **36** | **1,80,000** |
| | BUSINESS BUILDING S (E) | | | | | | |
| 1 | Less than 10 m in heights | **03** | **25,000** | **04** | **30,000** | **08** | **60,000** |
| 2 | above 10 m but not exceeding 15 m in height | **05** | **35,000** | **06** | **40,000** | **12** | **80,000** |
| 3 | above 15 m but not exceeding 24 m in height | **07** | **50,000** | **08** | **75,000** | **24** | **2,25,000** |
| 4 | Above 24m height | **10** | **75,000** | **10** | **1,00,000** | **30** | **3,00,000** |
| | MERCANTILLE BUILDING (F) | | | | | | |
| i | F-1 and F-2 | | | | | | |
| 1 | Less than 15 m in heights | | | | | | |
| | i) Ground plus one story, with total covered area not exceeding 500 m2 | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Ground plus one storey and covered area exceeding 500 m2 | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| | iii) More than ground plus one storey | **07** | **35,000** | **08** | **40,000** | **16** | **80,000** |
| 2 | Above 15 m but not exceeding 24 m in height | **08** | **50,000** | **09** | **75,000** | **27** | **1,50,000** |
| 3 | Above 24 m but not exceeding 30 m in height | **10** | **75,000** | **12** | **1,00,000** | **36** | **3,00,000** |
| b) | Underground shopping complex (F -3) | | | | | | |
| | INDUSTRIAL BUILDINGS (G) | | | | | | |
| a) | Up to 18 m in height | | | | | | |
| | i) Covered area up to 50 m2 | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Covered area above 50 m2 and up to 100 m2 | **05** | **25,000** | **06** | **30,000** | **12** | **60,000** |
| | iii) Covered area above 100 m2 and up to 200 m2 | **7** | **35,000** | **08** | **50,000** | **16** | **1,00,000** |
| | iv) Covered area above 200 m2 and up to 400 m3 | **10** | **50,000** | **12** | **75,000** | **24** | **1,50,000** |
| | v) Covered area above 400 m2 | **15** | **1,00,000** | **15** | **1,25,000** | **30** | **2,50,000** |
| b) | Moderate Hazard (G – 2) | | | | | | |
| 1 | Up to 18 m in height | | | | | | |
| | i) Covered area up to 100 m2 | **03** | **20,000** | **04** | **25,000** | **08** | **50,000** |
| | ii) Covered area above 100 m2 and | **05** | **35,000** | **06** | **50,000** | **12** | **1,00,000** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | up to 250 m2 | | | | | | |
| | iii) Covered area above 250 m2 and up to 500 m2 | **07** | **50,000** | **08** | **75,000** | **16** | **1,50,000** |
| | iv) Covered area above 250 m2 | **10** | **1,00,000** | **12** | **1,25,000** | **24** | **2,50,000** |
| c) | High Hazard (G – 3) See Note (2) | | | | | | |
| 1) | (A) Up to 15 m in height | | | | | | |
| | i) Covered area up to 50 m2 | **03** | **25,000** | **04** | **30,000** | **08** | **60,000** |
| | ii) Covered area above 50 m2 and up to 150 m2 | **05** | **30,000** | **06** | **35,000** | **12** | **70,000** |
| | iii) Covered area above 150 m2 and up to 300 m2 | **07** | **40,000** | **08** | **50,000** | **16** | **1,00,000** |
| | iv) Covered area above 300 m2 and up to 500 m2 | **10** | **50,000** | **12** | **75,000** | **24** | **1,50,000** |
| | v) Covered area above 500 m2 | **15** | **1,00,000** | **15** | **1,50,000** | **30** | **3,00,000** |
| | (B) Cross Country Pipelines carrying hazardous Gases and Petroleum products. | **15** | **1,00,000** | **15** | **1,50,000** | **30** | **3,00,000** |
| | STORAGE BUILDINGS (H) | | | | | | |
| 1 | Up to 15 m in height | | | | | | |
| | (i) Single Storey Building | **07** | **20,000** | **08** | **25,000** | **16** | **50,000** |
| | (ii) Ground plus one floor | **10** | **25,000** | **12** | **30,000** | **24** | **60,000** |
| 2 | Above ground plus one floor | **15** | **35,000** | **18** | **40,000** | **36** | **80,000** |
| | HAZARDOUS BUILDINGES (J) | | | | | | |
| I | Up to 15 m in height | | | | | | |
| | (i) Single Storey Building | **10** | **25,000** | **12** | **30,000** | **24** | **60,000** |
| | ii) More than one floor building but not exceeding 15 m | **15** | **35,000** | **18** | **40,000** | **36** | **80,000** |
| II | Annual Fee<br>As per Maharashtra act no. 13(1) & 14(3) to of Levied from date of Commencement of the Maharashtra from prevention and life safety measure Act. The Annual fee shall be calculated on minimum fees as per the provision of Act. | **--** | **--** | **---** | **---** | **1%** | **On minimum fees** |

करीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 11(1) उपकलम (2) व (3) चे तरतुदीनुसार सुधारित अग्निशमन शुल्क आकारणीच्या विषयास महासभेपुढे ठेवण्यास स्थायी समितीने एकमताने विचारात घेवून एकमताने मंजूर, तसेच म.न.पा. सभागृहाची धोरणात्मक निर्णय असल्यामुळे मंजूरी आवश्यक आहे. सभागृहासमोर सादर करण्यास एकमताने शिफारस करण्यांत येते यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 734</u>:— मौजा—नरसाळा दिघोरी नरसाळा रोड पासुन पुरूषोत्तम {लोककर्म झोन 05} थोटे कॉलेज ते पाण्याच्या टाकी पर्यंत आर.सी.सी. पावसाळी नाली टाकण्याचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. राजेश

कन्स्ट्रक्शन यांची १७.१८ टक्के कमी दराची रू. ७२,५९,६५०/— ची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 735:— {लोककर्म झोन 05} मौजा—नरसाळा येथील बॅक कॉलनी भागातील रस्त्यांचे खडीकरण व सरफेस ड्रेसींगचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. आर्यमा ईन्फ्राक्ट्रचर्स यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ११.०५ टक्के कमी दराची युटीलिटी सर्व्हीसेस करिता लागणाऱ्या अतिरिक्त खर्च रू. ३,३८,४७३/— सह, प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३७,९७,३२६/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 736:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ४४—अ अंतर्गत दर्शन कॉलनी येथील श्री. केवटे ते दुबे यांच्या घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. अमोल पुसदकर यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ४.०० टक्के कमी दराची व्दितीय निम्नतम निविदा राशी रू. २६,२३,११२/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 737:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. ४१ अ महाल राहतेकरवाडी येथे नाल्यावर आर सी सी बॉक्स सेल पुलाचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ४ निविदांपैकी मे. एम डी सोमकुवर यांची प्राकलनिय दरांपेक्षा ०.९९ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २९,६९,९३०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 738:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 02 (ब) येथील कामगार नगर, कपील नगर, अंगुलीमाल नगर, सहयोग नगर येथील सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 25,98,690/— पेक्षा 13.61 टक्के कमी दराची रू. 22,45,007/— (रूपये बावीस लक्ष पंच्चेचाळीस हजार सात) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. हे काम पद क्र. 679 (A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 739:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 41 अ महाल येथे निशिसेल ते वाकर रोडपर्यंत आपदेव नाल्याचे बांधकामास्तव प्राप्त ४ निविदा पैकी मे. सलीम अहमद शब्बीर अहमद अन्सारी यांची प्राकलनीय दरांपेक्षा ५.६९ प्रतिशतने अधिक दराची रू. ३१,६८,८१६/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 740:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 71 'अ' अंतर्गत गुडलक सोसा., आदिवासी कॉलोनी, प्रगतीनगर व दुबे ले—आउट येथील रोडच्या

कडेला आय ब्लॉक लावण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अथर्व कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा १७.००% टक्के ने कमीवर असलेली रू. ३८,२३,४९३/— (अळतीस लक्ष, तेवीस हजार, चारशे त्र्यान्नव फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 741:— {लोककर्म विभाग} इतवारी दहीबाजार रेल्वे उड्डाणपुलाचे रेल्वे स्टेशन कडील स्लीप रोड रेल्वे विभागाच्या जागेतून अस्तित्वातील रेल्वे विभागाचे कंपाउन्ड भिंत व गेट तोडुन तयार करण्यात आल्याने रेल्वे विभागाची नविन कंपाउन्ड वॉल, गेट व स्लीप रोड करिता पादचारी मार्ग इत्यादी कामे करण्याकरीता रू. २५,१८,६९५/— रकमेच्या कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त एकमेव मे. बजोरीया ईन्टरप्राईजेस यांची ५.०० टक्के अधिक सुधारीत दराची रू. २६,४४,९२४/— राशीची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 742:— {उद्यान विभाग} महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 च्या कलम 18 अन्वये नागपूर महानगरपालिका सिमे अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या वार्षिक भाडयाच्या 1 प्रतिशत वृक्ष उपकर (Tree Cess) लावण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन शहरात एकुण वृक्ष किती आहे, त्यांची संख्या व वृक्ष उपकरापासून महापालिकेस किती उत्पन्न होणार आहे, तसेच नगररचना विभागाकडून घेण्यांत येणाऱ्या वृक्ष ठेवी पासून काय उत्पन्न प्राप्त झाले या सर्व माहितीसह विषय परत सादर करावा, विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 743:— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. ४९—अ अंतर्गत उंटखाना चौक ते अजंटा हॉल पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंटीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. एस. के. गुरबक्षाणी यांची प्राक्कलनीय दरापेक्षा ११.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २४,६०,६८४/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 744:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 42 अ शिवाजी नगर येथे आर सी सी बॉक्स सेलचे नाल्यावर पुलाचे बांधकामास्तव प्राप्त २ निविदा पैकी मे. सलीम अहमद शब्बीर अहमद अन्सारी यांची प्राकलनीय दरांपेक्षा ६.८६ प्रतिशतने अधिक दराची रू. २७,९८,२९६/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 745:— {लोककर्म झोन 08} भांडेवाडी डंपीग परीसरातील रस्ते खडीकरण (प्रथम चरण) हे काम प्राप्त निविदाकार मे. आर. बी. केवलरामानी यांचे प्राकलनीय दरापेक्षा 14.00 टक्के कमी दराची रू. 68,07,650/— राशिची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. या कामाचा खर्च पद क्र. A 4420122202 अंतर्गत प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 746:–</u> {लोककर्म झोन 05} मौजा–नरसाळा, प्रभात नगर येथील रस्त्याचे खडीकरण व सरफेस ड्रेसिंगचे काम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी में. आर. बी. केवलरमानी यांची १४.०० टक्के कमी दराची युटीलिटी सर्व्हीसेस करिता लागणाऱ्या अतिरिक्त खर्च रू. ६,९८,१२७/– सह,रू. ७७,२४,२१०/– ची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 747:–</u> {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 04 (ब) येथील आक्शा मस्जिद जवळ रोशन शाळेपर्यंते संमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव प्राप्त निपिदापैकी मे. आर.बी.केवलरामाणी यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 33,58,780/– पेक्षा 18 टक्के कमी दराची रू. 27,54,198/– (रूपये सत्तावीस लक्ष चौप्पन हजार एकशेअठठयानव) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 748:–</u> {स्थावर विभाग} महानगरपालिकेच्या मालमत्तेवर एकुण ३८ जाहिरात फलक उभारुन त्यावर जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या **रु. ७८,३२,९५८/–** च्या निविदा खाली तक्त्यामधे नमुद केल्याप्रमाणे मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

| अ क्र | निविदाकाराचे नांव | एकुण जाहिरात फलक | साईट क्र. | एकुण निविदा (ऑफसेट) किंमत | एकुण प्राप्त महत्तम निविदा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. एक्सलव्हयु आउटडोअर्स | ४ | १३, ७१, ११७, १५६ | रु. ५,२०,६३३/– | रु. ९,००,९०८/– |
| २ | मे. प्राईम साईटस | ३ | ३९, १३६, २०९ | रु. ७,६२,५६४/– | रु. ८,८३,९३१/– |
| ३ | मे. जेमिनी आउटडोअर्स ॲडव्हरटायजींग प्रा. ली. | ८ | ३६, १००, १६८, १७१, १७२, १८३, १८५, १८९ | रु. ५,९५,५३३/– | रु. ६,९५,५३३/– |
| ४ | मे. वर्षा आउटडोअर्स ॲडव्हरटायजींग प्रा. ली. | १ | ४९ | रु. ३,५०,१३२/– | रु. ५,४५,४५४/– |
| ५ | मे. शान क्रीएशन | २ | २०१, २१३ | रु. १,३७,८००/– | रु. १,६२,१००/– |
| ६ | मे. प्रॉफीट ॲडव्हरटायजर्स (इंडीया) प्रा. ली. | १ | ९५ | रु. २,१४,५००/– | रु. २,३५,०००/– |
| ७ | मे. शार्प ॲडव्हरटायजींग एजेन्सी | २ | ६, २२ | रु. ४,८१,६००/– | रु. ६,५०,७००/– |
| ८ | मे. एविस ॲडव्हरटायजींग | २ | ६७, १९५ | रु. २,२०,४१०/– | रु. ४,७९,७००/– |
| ९ | मे. साईनपोस्ट इंडीया प्रा. ली. | १० | १, ४०, ९३, ११५, १३७, १४३, १४४, १५९, १७०, १७६ | रु. १८,५५,४३१/– | रु. २०,४१,०००/– |
| १० | मे. विजय इंटरप्रायजेस | ५ | १२, ५३, ८२, १५३, १७५ | रु. ६,८८,८६०/– | रु. १२,९८,५२०/– |
| एकुण | | ३८ | | रु. ५८,२७,४६३/– | रु. ७८,३२,९५८/– |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 749</u>:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 37 अ हिवरीनगर व शास्त्रीनगर येथे विविध ठिकाणी नाग नदिच्या तुटलेल्या भिंतीची दुरुस्ती करणेच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. विश्वदीप इंटरप्रायजेस यांची 0.9999 टक्के कमी दराची रु. 38,82,598/— (अक्षरी अडतीस लक्ष ब्यांशी हजार पाचशे अठ्ठयान्नव रुपये ) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 618 ( A43901370812 ) अंतर्गत प्रस्तावीत आहे.

<u>ठराव क्रमांक 750</u>:— {लोककर्म झोन 05} मौजा—नरसाळा येथील अंबिकानगर भागातील रस्त्यांचे खडीकरण व सरफेस ड्रेसींगचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. बाबा कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १०.५० टक्के कमी दराची युटीलिटी सर्व्हीसेस करिता लागणाऱ्या अतिरिक्त खर्च रू. २,८१,५३४/— सह, प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३०,९५,२३१/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 751</u>:— { विद्युत विभाग} लंकडगंज झोन क्र. ०८ प्रभाग क्र. ३५/अ मध्ये ठिकाणी ६ मी उंच खांब व फिटींग तसेच विविध ठिकाणी १२.५ मी हायमास्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रू. ३१,६२,५७१/— च्या प्राकलनीय राशीपेक्षा २.०० टक्के ने कमी असलेल्या रू. ३०,९९,३२०/— ची निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 752</u>:— {लोककर्म झोन 5} **प्रभाग क्र. ६०—ब** अंतर्गत जुना सक्करदरा गवंडीपुरा सोलंकीवाडी पी.एफ क्वॉटर समोरील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण दोन निविदाकाराची निविदांपैकी **मे. डी. सी. गुरबक्षाणी** यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी **रू. २६,४७,३६२/—** रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 753</u>:— { लोककर्म झोन 5} प्रभाग क्र. ६० अ व ब सक्करदरा येथील दत्तात्रय नगर येथे रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण दोन निविदाकाराची निविदांपैकी मे. डी. सी. गुरबक्षाणी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २९,९९,९६१/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 754</u>:— {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. २५(ब) येथील गीरीपेठ व गोरेपेठ व सिंडिकेट बॅक समोरील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी घ्यांची मुळ प्राकलनिय दराची निविदा रूपये 29,98,587/—( रूपये एकोणतीस लक्ष अठयांनऊ पाचशे सत्यांशी रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क 682 (Fix Priority) (A22001330803) अंतर्गत

प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 755:— {कार्य. अभियंता झो.पु.प्रा.} नागपूर महानगरपालिका अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, तर्फे संजयगांधी नगर च्या झोपडपट्टी मध्ये बी.एस.यु.पी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येत असून या अंतर्गत पायाभूत सुविधांचे कामाकरीता निविदा मागविल्या असता मे. हितेश कंस्ट्रक्शन यांनी ११% कमी दराची निविदा मंजूर करण्याचा तसेच या निविदेतील महानगरपालिकेचा हिस्सा रु. १०.५५ लक्ष ची तरतूद पद क्र. A476013-60601 अंतर्गत मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 756:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. ३२ ब सतनामी नगर येथे १) भुखंड क्र. १०३ ते ११६ व २) मस्जिद ते श्री गुडधाने यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा ११.९ टक्के कमी दराची रु. ४४,०२,९७४/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. ६७९ (A242001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 757:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 36—ब, मधील देशपांडे लेआऊट आणि नेहरू नगर येथील नागनदीच्या भिंतीची दुरूस्ती करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. विश्वदिप इंटरप्राईजेंस यांचे प्राकलनीय दरापेक्षा —0.9999 टक्के कमी दराची रू. 3277776/— राशिची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. A 43901370812 अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 758:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. २९ अ आणि ब हंसापुरी सिटी होंडा सर्व्हीस सेंटर ते चंद्रलोक बिल्डींग आणि श्री इफ्तेखार लिडर ते श्री हरडे यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ३ निविदांपैकी मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा १०.५३ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २६,८३,६०८/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 759:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. ६३ अ व ब अंतर्गत गुरूदेव नगर, अयोध्यानगर बिडीपेठ, सुभेदार ले आऊट ठवरे कॉलनी संजय नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. के. नगराळे कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २९,९८,९५४/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 760:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. ३२ ब सतनामी नगर येथे श्री. बत्रा ते श्री. बादुले यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. संतोष खरपकर यांची प्राकलनीय दरापेक्षा

१२.६३ टक्के कमी दराची रु. २३,४८,६६५/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. ६७९ (A242001470511) अंतर्गत प्रस्तावित आहे.

ठराव क्रमांक 761:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. ४२ अ राहतेकरवाडी येथे गायत्री कॉन्व्हेन्ट, सानेगुरूजी उर्द शाळा श्री खैरकार यांच्या घराजवळ सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त ४ निविदांपैकी मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा १३ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ६४,८१,४३०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 762:— {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 72 विमानतळ अंतर्गत पडोळे चौक ते ढोमने हॉल पर्यन्त रोडचे डांबरीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ५५,५४,७७६/— (पंचावन लक्ष, चौपन हजार, सातशे छयात्तर फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 763:— { लोककर्म झोन 1} प्रभाग क्र. 56 'ब' अंतर्गत हिंदुस्थान कॉलोनी, प्रशांत नगर पर्यन्त रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. अमृता कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरानुसार असलेली रू. ३२,३८,६९८/— (बत्तीस लक्ष, अळतीस हजार, सहाशे अठ्ठयान्नव फक्त) रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 764:— {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 59 (अ) रह्युजीनगर पोलीस क्वार्टर जवळील उद्यानात विविध कामे करण्याचे एकत्रित कामाचे रू. 26,74,657/— रक्कमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 424 दिनांक 29.08.2016 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त खालील प्रमाणे.

| अनु क्र. | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | निविदा दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. श्री. कन्सट्रक्शन | प्राकलनीय दर | रू. 5,61,722/— |
| 2 | फवारा बसविणे | मे. कृषीमित्र इरि. सर्व्हिसेस | प्राकलनीय दर | रू. 2,46,800/— |
| 2 | हिरवळीची कामे | मे. श्री. कन्सट्रक्शन | प्राकलनीय दर | रू. 14,57,135/— |
| 3 | खेळणी बसविणे | मे मल्टीपल सोल्युशन | प्राकलनीय दर | रू. 4,09,000 |
| | | | एकुण रू. | रू. 26,74,657/— |

वरील एकत्रित रू. 26,74,657/— रक्कमेच्या निम्मतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली. (खर्च पद क्र. A46001673101)

ठराव क्रमांक 765:— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. 64 ब अंतर्गत दुर्गानगर, येथील परिसरात सिमेंट रोडचे बांधकाम करण्याच्या कामासतव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. आर.बी. केवलरमानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.00 टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 44,99,807/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 766</u>:— प्रभाग क्र. ४२ अ महाल येथे श्री शौकत कुरेशी व
{लोककर्म झोन 06} अतुल जिभकाटे यांच्या घराजवळ ठिकठिकाणी सिमेंट रोडचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. ३४,९९,१७९/— रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. ३७० व नविन पद क्र. A22001330801 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 767</u>:— **नागपूर महानगरपालिकाद्वारा परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या**
{क्रीडा व सां.वि.} **जयंती निमित्त व महात्मा ज्योतीबा फुले यांचा स्मृती वर्षा निमित्त व पंडीत दिनदयाल उपाध्याय यांच्या शताब्दी वर्षा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. याकरिता रु. १ कोटीची तरतूद पद क्र. A२६५०१३४२२०४ अंतर्गत करण्यात आली असून आपण सर्वांनी मिळून विविध कार्यक्रमाचे माध्यमातून हे वर्ष साजरे करण्याचे मा. अध्यक्ष, स्थायी समिती, म.न.पा. यांनी वर्ष २०१६-१७ च्या प्रस्तावित अंदाजपत्रकात घोषित केलेले आहे.**

**त्याअनुषंगाने मा. महापौर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षा निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन समिती गठीत असून सदर समितीचे अध्यक्ष श्री संदीप जाधव नगरसेवक तथा माजी उपमहापौर यांनी नेमणूक केलेली आहे. सदर समितीमध्ये विविध कार्यक्रमाचा आयोजनाबाबत दि. २४/१०/२०१६ रोजी स्थायी समिती, सभागृहात सर्व सहभागी संस्थांची बैठक घेण्यात आली. त्यानुसार कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करण्यात आले. दि. १२/११/२०१६ ते ६/१२/२०१६ पर्यंत कार्यक्रम निश्चित करण्यात आले. त्यानुसार नस्ती तयार करुन मा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आली. मा.आयुक्त यांचे दि. ९/११/२०१६ रोजीच्या निर्देशाप्रमाणे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत सुचविलेले आहे.**

**सदर बाबतीत मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांचे सोबत दि. ९/११/२०१६ रोजी चर्चा करण्यात आली त्यामध्ये मा.आयुक्त यांचे सुचनेप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास हरकत नसल्याचे मा. स्थायी समिती अध्यक्ष यांनी निर्देशित केलेले असून खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नांव | कार्यक्रम सादर करणारी संस्था | कार्यक्रम स्थळ | झोन क्रमांक | कार्यक्रम दिनांक | कार्यक्रमाचा संस्थेनी दिलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | 'चले हम प्रबुद्ध भारत की ओर' (हिंदी महानाट्या) | बहुजन रंगभूमी, नागपूर | चंदन नगर, हनुमान नगर, नागपूर | हनुमान नगर, झोन क्र. - ३ | १२ नोव्हेंबर २०१६ शनिवार | ६ लक्ष |
| २ | 'तथागत' (हिंदी महानाट्या) | शैलेंद्र बागडे आणि संच | शांती नगर, सतरंजीपुरा | सतरंजीपुरा, झोन क्र. - ७ | १३ नोव्हेंबर २०१६ रविवार | ६ लक्ष |
| ३ | 'यशोधरा की यशोगाथा' | शिव कलासागर | कामगार नगर | लक्ष्मी नगर, झोन क्र. - १ | १९ नोव्हेंबर २०१६ शनिवार | ४.८० लक्ष |
| ४ | 'महासुर्य' (महानाट्या) | सम्यक थिएटर, नागपूर | बॅनर्जी ले आऊट, धंतोली | धंतोली, झोन क्र. - ४ | २० नोव्हेंबर २०१६ रविवार | ७.२४ लक्ष |
| ५ | 'जागर समतेचा' (लोकगीत-लोकसंगीत) | किलबिल थिएटर, नागपूर | हिवरी नगर, सुगत बुद्ध विहार, बाभूळवन | लकडगंज, झोन क्र. - ८ | २५ नोव्हेंबर २०१६ शुक्रवार | ५ लक्ष |
| ६ | 'नमन बुद्ध भीम को' | संजीवनी सखी बहुउद्देशिय संस्था | बेझनबाग मैदान, नागपूर | आसीनगर, झोन क्र. - ९ | २६ नोव्हेंबर २०१६ शनिवार | ३.६० लक्ष |
| ७ | 'मी लेक भिमाची' (वैशाली माडे लाईव्ह इन कन्सर्ट) | अश्वघोष कला अकादमी | चिटणिस पार्क (गांधीबाग) | गांधीबाग, झोन क्र. - ६ | २६ नोव्हेंबर २०१६ शनिवार | ७ लक्ष |
| ८ | 'रमाई' (महानाट्या) | बुद्धिष्ट थिएटर, नागपूर | दर्शन कॉलनी मैदान, नेहरु नगर | नेहरु नगर, झोन क्र. - ५ | २७ नोव्हेंबर २०१६ रविवार | ५ लक्ष |
| ९ | 'मी लेक भिमाची' (वैशाली माडे लाईव्ह इन कन्सर्ट) | अश्वघोष कला अकादमी | झिंगाबाई टाकळी | मंगळवारी, झोन क्र. - १० | २७ नोव्हेंबर २०१६ रविवार | ७ लक्ष |
| १० | 'भीमा तुझ्या जन्मामुळे...' (अभीजीत-प्रसेनजीत- सत्यजीत लाईव्ह इन कन्सर्ट) | बोधी फाऊंडेशन, नागपूर | अंबाझरी हिल टॉप, श्री परिणय फुके यांच्या शाळेसमोर, | धरमपेठ झोन क्र. २ | ३० नोव्हेंबर २०१६ बुधवार | ७ लक्ष |
| ११ | 'राजगृहाची निळी स्पंदने...' (गीत-नाट्या-नृत्य-निवेदनाचा महासंग्राम) | बोधी फाऊंडेशन, नागपूर | यशवंत स्टेडिअम | धंतोली, झोन क्र. - ४ | ६ डिसेंबर २०१६ मंगळवार | ३० लक्ष |

**उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा तथा तक्यातील क्र. ८ मधील एकूण रु. ८८.६४ लक्ष खर्चाचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,**

**१) अनु. क्र. १ ते १० मधील प्रस्तावित कार्यक्रमास मानधन धनादेशाद्वारे व इतर व्यवस्था निविदा किंवा आवेदनाद्वारे करण्यांत यावे. या सर्व कार्यक्रमाच्या वेळा पत्रकात बदल करण्याचा अधिकार आयोजन समितीच्या अध्यक्षास प्रदान करण्यांत येते.**

**२) अनु. क्र. ११ मधील कार्यक्रम रु. २५ लक्षा पेक्षा अधिक असल्यामुळे मानधन सोडून ईतर व्यवस्थेच्या लघू निविदा तसेच इतर बाबींचे आवेदन करण्यांत यावे.**

**३) अनु. क्र. १ ते ११ पर्यंतच्या कुठल्या कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार समिती अध्यक्षांना देण्यांत येते परंतू प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या राशीचे आत त्याची मर्यादा राहील याची नोंद घ्यावी या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 768:– नागपूर महानगरपालिका ठराव क्र. 34 दि. {सा.प्र.वि.} 20/01/2016 अन्वये महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी पदाचे आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांचा प्रस्ताव तयार करण्याकरिता मा. महापौरजी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली होती. त्या समितीने वेळोवेळी विभाग प्रमुखांसह सभा घेऊन तयार करण्यात आलेला आकृतीबंध व सेवाप्रवेश महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्टच्या कलम 51(2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीकरिता पाठविण्यात आलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**स्थायी समितीने केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१ (३) नुसार फेरबदल**

# नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर

**अधिकारी व कर्मचारी पदनाम, पदसंख्या, संवर्ग व वेतनश्रेणी दर्शक विवरणपत्र (आस्थापना सूची)**

## १) सामान्य प्रशासन विभाग

| अ. क्र. | प्रस्तावित पदनाम व वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | महापौर यांच्या अध्यक्षतेखाली तदर्थ समितीने प्रस्तावित केलेली पदे | मा. आयुक्तांनी प्रस्तावित केलेली पदे | भरतीचा प्रकार | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पदोन्नती | | सरळसेवा/प्रतिनियुक्तीने | | |
| | | | | | शैक्षणिक पात्रता | प्रमाण | शैक्षणिक पात्रता | प्रमाण | |
| ३ | *सहा. आयुक्त* १५६००. ३९१०० GP ५४०० | ११ | १७ | १५ | महापालिकेच्या अधिक्षक संवर्गातील कर्मचा-यांमधुन किमान ३ वर्षाचा अनुभव. | ८ पदे | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता आणि<br>२) राज्य शासनाकडील वर्ग-२ श्रेणी प्रशासकीय अधिकारी किंवा समकक्ष पदावरील किंवा अ/ब महापालिका आस्थापनेवरील अधिक्षक या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करणा-या उमेदवारांमधुन सरळसेवेने नेमणूक करता येईल.<br>३) शासन सेवेतील/निमशासकीय सेवेतील/स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पद ५ वर्षापासुन धारण करणारे अधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल. | ७ पदे | विशेष कार्यासन अधिकारी- १ पद समायोजित<br>(०३ पदे नव्याने प्रस्तावित)<br><br>१३-झोनकरिता<br>२-साप्रवि |

**स्थायी समितीने केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१ (३) नुसार फेरबदल**

# नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर

## अधिकारी व कर्मचारी पदनाम, पदसंख्या, संवर्ग व वेतनश्रेणी दर्शक विवरणपत्र (आस्थापना सूची)

## ४) सार्वजनिक बांधकाम विभाग

| अ.क्र. | प्रस्तावित पदनाम व वेतनश्रेणी | मंजूर पदसंख्या | महापौर यांच्या अध्यक्षते खाली तदर्थ समितीने प्रस्तावित केलेली पदे | मा. आयुक्तांनी प्रस्तावित केलेली पदे | भरतीचा प्रकार | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पदोन्नती | | सरळसेवा/प्रतिनियुक्तीने | | |
| | | | | | शैक्षणिक पात्रता | प्रमाण | शैक्षणिक पात्रता | प्रमाण | |
| 1. | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) ९३००.३४८०० GP ४३०० सहाय्यक अभियंता-।। | ९८ | २१५ | २५० (१२५+१२५) | पदोन्नती व्दारे<br>१) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातून सेवा जेष्ठतेने व योग्यतेनुसार किमान १० वर्षे अनुभव.(२५ टक्के)<br>२) स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातून अंशकालीन किंवा दुरशिक्षणाद्वारे किंवा पदविका अशी अर्हता धारण केलेली आहे अशा स्था.अ.सहा. मधून जेष्ठता व योग्यतेनुसार. (२० टक्के)<br>३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मधून ज्यांनी अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय नाशिक यांच्याकडून घेण्यात येणारी कनिष्ठ अभियंता या पदाची अर्हता परीक्षा उत्तीर्ण केली आहे. अशा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक मधून जेष्ठतेनुसार व योग्यतेनुसार. (५ टक्के) | ५० टक्के | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा शासनाव्दारे समकक्ष पदवी - सरळसेवा परिक्षेव्दारे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) मान्यताप्राप्त तंत्रानिकेतनची पदविका सरळसेवा परिक्षेव्दारे ३० टक्के (७५)<br><br>अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रीकी शाखेची पदविका किंवा स्थापत्य अभियांत्रीकी शाखेतील पदवी असल्यास प्राधान्य.<br>ब ) शासकीय/ निम शासकीय कार्यालया मधील सदर पदावर ०५ वर्ष कामाचा अनुभव | ५० टक्के | ७६ पदे नव्याने प्रस्तावित<br>लोककर्म विभाग - ०६ पदे<br>पाणीपूरवठा - ०४ पदे<br>मलनिस्सारण - ०४ पदे<br>पर्यावरण संवर्धन - ०४ पदे<br>स्थापत्य प्रकल्प - १४४ पदे<br>मलजल निस्सारण-०६ पदे<br>दक्षता गुणनियंत्रण -०६ पदे |

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१ (३) नुसार वरील दुरुस्ती व फेरबदलासह तसेच मुद्रणातील दुरुस्तीसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येत, तसेच प्रशासनाने उपरोक्त प्रस्ताव मुद्रणातील दुरुस्तीसह म.न.पा. सभागृहासमोर सादर करावा असे निर्देश ही स्थायी समिती देते यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक 769 :— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**–: ठराव :–**

सध्या स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रिंगरोडचे सिमेंट कॉक्रीटीकरण सुरु असल्यामुळे या मार्गावरील पथदिव्यांच्या केबलस् तुटून पथदिव्यांची व्यवस्था विस्कळित झालेली आहे. असे आढळलेले आहे.

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास नागपूर महानगरपालिकेतर्फे या ठिकाणच्या पथदिव्यांची व्यवस्था सुरळीत करण्या करिता रु. 26 कोटीची मागणी केलेली असल्याचेही विभागाद्वारे कळलेले आहे. नुकतेच संपूर्ण शहरातील पथदिवे एल.ई.डी. पथदिव्यांनी बदण्याचे कामाकरिता ज्या निविदा बोलविण्यांत आल्या आहेत त्या मध्ये या रु. 26 कोटीच्या किंवा या करिता जी अंतीमतःयोग्य रक्कम होऊ शकेल त्यांचाही समावेश करणे योग्य राहील असे मत आहे. जेणे करुन या कामास शासनातर्फे मंजूरी प्राप्त झाल्यास या कामाचे मेट्रो रुट वरिल पथदिव्यांच्या कामाप्रमाणे भूगतान करुन नागपूर महानगरपालिकेवरिल ई.एम.आय. रुपाने भूगतान करण्याचा अतिरीक्त बोझा येणार नाही. यासह वरिल ठराव एकमताने मंजूर करण्यांत यावा हि विनंती.

सुचक – हस्ता/– श्री. अनिल धावडे
अनुमोदक – हस्ता/– श्री. सुरेश जग्यासी
हस्ता/– श्री. किशोर गजभिये

<u>ठराव क्रमांक 770</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर